# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १२/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील महात्मा फुले चौक बुधवारी पेठ उमरेड येथे दिनांक ११/०८/२२ चे १८.०० वा. ते १२/०८/२२ चे ०८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– हर्षल बबनराव मुरकुटे, वय २८ वर्ष, रा. महात्मा फुले चौक, बुधवारी पेठ उमरेड हा दि. ११/८/२२ रोजी राखी सणानिमीत्य घराला कुलुप लावुन नागपुरला आईसोबत गेला व रात्रभर मुककाम करून दि. १२/८/२२ चे ०८.३० वा. उमरेड ला परत आला. तेव्हा त्याच्या घराची लॉकची कडी तुटलेली दिसली व लॉक दरवाज्यालाच दिसले. फिर्यादीने घराच्या आत जावुन पाहीले असता बेडरूम मधील लोखंडी कपाट खुले दिसले व कपाटातील सामान कपडे आजुबाजुला पडले होते. कपाटातील लॉकर खुले दिसले व त्यामधील नगदी ७५०००/–रू., २) सोन्याचे मंगळसुत्र कि. २०,०००/–रू. ३) सोन्याचे कानातील झुमके कि. १२,०००/–रू. असा एकुण कि. १,०७,०००/–रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले. तसेच फिर्यादीच्या घराचे बाजुला असलेली दि उमरेड महीला नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्या. नागपुर जि नागपुर हिचे समोरील चॅनल गेटला लागलेला लोखंडी ताला तोडण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि वाघ मो.न. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

### विनयभंग

**१) पो.स्टे. सावनेर**:– दिनांक १०/०८/२०२२ चे १९.३० वा. ते दिनांक १०/०८/२०२२ चे २०.०० वा. दरम्यान फिर्यादी वय ३५ वर्ष हिला आरोपी क्र. १ प्रशांत ठाकरे, वय ४७ वर्ष रा. पाटील हॉस्पीटल जवळ सावनेर याने माहे जुलै २०१९ पासुन ते सन २०२० पर्यंत फिर्यादीच्या मोबाईल क्रमांकावर मॅसेज करून प्रपोज केले. फिर्यादी ने आरोपी क्र १ ला हटकले असता आरोपी क्र १ ने फिर्यादीच्या मोबाईलवर अश्लील मॅसेज करून विनयभंग केले. त्यामुळे फिर्यादीचे पतीने आरोपी क्र १ ला घरी जावून त्यांच्या पत्नीला सर्व हकिकत सांगितली व त्यांना समजाविले फिर्यादीचे पतीने आरोपी क्र. १ च्या पत्नीला व मुलाला का सांगीतले या कारणावरून आरोपी क्र १ याने फिर्यादीचे पतीला मारण्याची धमकी दिली. दि १०/८/२०२२ रोजी सायंकाळी १९/३० वा ते २०/०० वा दरम्यान फिर्यादीचे पती हे त्यांच्या ऑफीस मधुन त्यांच्या कारने घरी परत येत असतांना खापा फाटा सावनेर येथे आरोपी क्र १ ने याला जाब विचारण्याकरीता खापा फाटा सावनेर येथे आले असता आरोपी क्र १ हा फिर्यादीला बघुन घरून निघुन गेला. त्यामुळे फिर्यादी ही तीचे पती सोबत आरोपीच्या घरासमोर जावुन आरोपी क्र १ यास आवाज दिला असता आरोपी क्र २. हर्ष प्रशांत ठाकरे, रा. पाटील हॉस्पीटल जवळ सावनेर हा घरा बाहेर येवून फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (डी), २९४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी फुलेकर मो.क्र. ७५८८५६४३००हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— दिनांक ११/०८/२०२२ चे २०.३० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १६ वर्ष हि कुठेही गावात दुकानात किंवा बाहेर गेल्यावर आरोपी क्र. १. गौरव गुणवंता बाविस्कर, वय १९ वर्ष, रा. महालगाव हा तिच्या सोबत बोलण्याचा प्रयत्न करुन पाठलाग करीत होता. फिर्यादीचे घरच्या लोकांनी हटकले असता आरोपी क्र. १. गौरव बाविस्कर याने त्याच्या मित्रांना फोन करुन बोलाविले थोडया वेळाने आरोपी क्र. २. धिरज शंकर दहेलकर वय १९ वर्ष, रा. महालगाव, आरोपी क्र. ३. तुषार गुणवता, वय २२ वर्ष, रा. महालगाव व आरोपी क्र. ४. मितेश खुशाल खांडेकर वय १८ वर्ष, रा. महालगाव हे फिर्यादीचे घरी आले व त्यांनी फिर्यादीचे घरच्या लोकांना हातबुक्कीने मारहाण केली व शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४ (ए), ३५४ डी, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवी. सहकलम १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बिरोले हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**